R.C.S 13/2005 0 Exh 250

प्रतिवादींच्या अर्ज, त्यास अनुसरून असणारे वादीचे म्हणणे, हजर केलेले कागदपत्र पाहिले. प्रतिवादी हा आजारी असल्यामुळे त्याला न्यायालयात येणे शक्य नसल्यामुळे कोर्ट कमिशनर यांची नियुक्ती करून उलटतपास घ्यावा अशी मागणी करण्यात आली होती. मात्र हल्लीच प्रतिवादी हा न्यायालयात उपस्थित राहिला होता. प्रतिवादीच्या पायाचे शस्त्रक्रिया झाली आहे व तो कुबड्या घेवून चालतो यात काही वाद नाही. मात्र तो फिरू शकतो, प्रवास करू शकतो असे एकंदरीत परिस्थितीवरून दिसते. सबब त्याला उभे राहून साक्ष द्यायला जमत नसेल तर तशी योग्य व्यवस्था करून न्यायालयात साक्ष घेता येईल. सबब त्याकरींता कोर्ट कमिशनर नियुक्त करणे गरजेचे नाही कारण तशी प्रतिवादीची परिस्थिती नाही. सबब अर्ज नामंजूर करण्यात येतो. प्रतिवादीने पुढील तारखेस हजर रहावे.

२४/१०/१५

दि. न्या. वेंगुर्ला.